पनवेल(प्रतिनिधी) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या विशेष निधीतून व जिल्हा वार्षिक निधीतून पूर्ण झालेल्या विकासकामांचे उदघाटन व लोकार्पण सोहळा मोठया उत्साहात सोमवारी पार पडला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा विशेष निधी व जिल्हा वार्षि क निधीतून पूर्ण करण्यात आलेल्या पालेखुर्द-चिंध्रण रस्ता कॉकीटीकरण, चिंचवली ते आंबा रस्ता मजवुतीकरण व डांबरीकरण, आंबा अंतर्गत रस्ते कॉकीटीकरण, चिंचवली, शिरवली ते वांगणी तर्फे तळोजे रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण, शिरवली अंतर्गत रस्ते कॉकीटीकरण या विकासकामांचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश कमिटीचे सदस्य अरूणशेठ भगत, महिला कॉंग्रेसच्या पनवेल तालुका अध्यक्ष ॲड.आशा भगत, उपाध्यक्षा समिना साठी, पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कामोठे शहर अध्यक्षा दिक्षा जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास शिरवली जिल्हा परिषद कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे, पंचायत समितीच्या माजी सदस्या विजया सिनारे, वांगणी तर्फे वाजे महिला अध्यक्षा वंदना भोपी, माजी सरपंच तुकाराम पाटील, बाळाराम पाटील, संघटक भालचंद्र सिनारे, ज्येष्ठ कार्यकर्ते गणपतबुवा रिकामे, गणाबुवा पाटील, नारायणशेठ चोरमेकर, तुकाराम आदईकर, गुलाब रंधवी, प्रमिला जाधव, शिरवली पंचायत समिती विभागीय अध्यक्ष पांडुरंग पाटील, पांडुरंग जाधव, मंजुला ठाकरे, शारदा पाटील, प्रिती पाटील, प्रतिक्षा जाधव, सुरेश खाने, युवा नेते फुलचंद पाटील, दीपक बोंडे, दीपक खानावकर, अनंता पाटील, गणपत बडेकर, महादेव गडगे, श्रीराम दुर्गे, रमेश ठाकरे, चंद्रकांत पाटील, नारायण जाधव, सोपान कणेरे, गयनीनाथ रंधवी, भालचंद्र मुंढे, मधुकर दुर्गे, रमेश सिनारे, किरण ठाकरे, दयानंद पाटील, सुरेश दुर्गे, किसनबुवा सिनारे, दत्तुबुवा ठोंबरे, बाळकृष्ण दुर्गे, विजय बोंडे, सुदाम ठाकरे, अनंता सिनारे, भगवान खानावकर, गणेश रंधवी, एकनाथ पाटील, राम पाटील, संतोष पाटील, शनिवार रंधवी, बाळा खानावकर, संतोष खानावकर, सिताराम रंधवी, ज्ञानेश्वर पाटील, प्रभाकर पाटील, सिताराम म्हात्रे, दत्तू सिनारे, गणेश जाधव, गोपीनाथ उलवेकर, जनार्दन सोरखादे, भिवा पाटील, जगन्नाथ पाटील, चांगो बेनारे, मारूती पाटील, वत्सला पाटील, आश्विनी जाधव, शश्किला सिनारे, वैशाली बडेकर, पार्वती पाटील, निर्मला सिनारे, भारती जाधव, सुनंदा पाटील, कुंदा जाधव, वंदना पाटील, सुमन रंधवी, विठाबाई खानावकर, सजना पाटील, भारती पाटील, भिमाबाई उलवेकर, वंदना उलवेकर, रेणुका पाटील, अर्च ना पाटील, गिरीजा रंधवी, जयश्री रंधवी, शकून खानावकर, रसिका खानावकर, ताई पाटील, वर्षा रंधवी, वनिता पाटील, संगिता पाटील, करूणा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

विधानसभा क्षेत्रातील शहरांबरोबरच प्रत्येक गावात, खेडोपाडयाचा विकास झाला पाहिजे यासाठी मी सदैव कटीबध्द आहे. आमदार म्हणून काम करण्याची संधी ज्येष्ठ, युवक, महिला कार्यकर्त्यांची मेहनत आणि जनतेच्या आशिर्वादामुळे मला मिळाली आहे, म्हणुनच मी पनवेलच्या विकासासाठी काम करू शकलो आहे. यापुढेही विकासाचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी मला आपला आशिर्वादाचे पाठबळ लागणार आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास हाच आपला ध्यास आहे. म्हणूनच शहराप्रमाणे ग्रामीण भागातील विकासाला केंद्रबिंदू मानून लोकांच्या मागण्यांना प्राधान्य देवून विकासकामांना जास्तीत-जास्त निधी देण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढील काळात जनता आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे आणि ताकदीमुळे विकासाचा झंझावात कायम ठेवू. -आमदार प्रशांत ठाकूर

पनवेलमधील सर्व गावांमध्ये तसेच दुर्गम भागात विकासकामे करण्याचे महत्वपूर्ण कार्य आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. लोकांच्या गरजा काय आहेत, गावांना कोणत्या विकासकामांची आवश्यकता आहे याची दक्षता घेवून त्यांनी कामे केली आहेत. शहराचा विकास करण्याबरोबरच आदीवासी वाडया-पाडयामध्ये विकासकामे करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी जागृत लोकप्रतिनिधी असल्याचे दाखवून दिले आहे.

- अरूणशेठ भगत

आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांमुळे पनवेल विधानसाभा क्षेत्रात विकासाची गंगा आली आहे. पनवेलच्या इतिहासात कोणालाही विकासकामे करता आली नाहीत त्याच्या कित्येक पटीने आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामे केली आहेत. गोरगरीबांची जाण त्यांना असल्यामुळे त्यांच्याकडून नेहमी विधायक कार्य घडत असून पुन्हा एकदा त्यांना आमदार म्हणून निवडून आणण्यासाठी आणि पनवेलच्या विकासाचा आलेख उंचविण्यासाठी कार्यकर्ते आणि जनता सज्ज झाली आहे. - ॲड.आशा भगत